# प्रकरण – 17

## नियमित विचारले जाणारे प्रश्न

अ) हॉस्पिटलमध्ये ब्लड बँक आहे काय ?

उत्तर : नाही. हॉस्पिटलमध्ये ब्लड बँक नाही.

ब) हॉस्पिटलमध्ये विशेष देय रूम आहे काय?

उत्तर : नाही. हॉस्पिटलमध्ये विशेष देय रूम नाही.

क) वरिष्ठ डॉक्टर उपलब्ध आहेत काय ?

उत्तर : होय. ब-याच विभागांत वरिष्ठ डॉक्टर्स उपलब्ध आहेत.

ड) त्यांना औषधासाठी पैसे द्यावे लागतात का ?

उत्तर : नाही. औषधे मोफत आहेत.

इ) हॉस्पिटलमध्ये आकस्मित/तात्काळ विभाग आहे काय ?

उत्तर : हॉस्पिटलमध्ये तात्काळ सेवा / बाह्यरूग्णविभाग 24 तास कार्यरत आहे आणि सर्व आकस्मित रूग्णांना तपासले जाते आणि गरज नुसार दाखल केले जाते. मेडिकोलिगल केसेस प्रथम घेऊन त्यचेवर प्रथमोपचार उपचार करून पुढे उच्च सुविधा असणा-या हॉस्पिटलमध्ये गरजेनुसार पाठविल्या जातात.

फ) त्यांना एक्स-रे/इसिजीसाठी पैसे द्यावे लागतात काय?

उत्तर : होय. एक्स-रे आणि इसिजीसाठी ठरलेली फी द्यावी लागते.

2) जर रूग्णांना काही अधिक माहिती हवी असल्यास त्यानी को-या कागदावर आपले नाव, पत्ता, टेलिफोन नंबर, हवे असलेले प्रमाणपत्र /दस्ताचे नाव, आवश्यक असलेली माहिती. कारण आणि त्यासाठी लागणारी फी भरणा करून, अर्जावर खाली आपली स्वाक्षरी करून तो अर्ज मंजूरीसाठी प्रमुख्य वैद्यकिय अधिका-याकडे देण्यात यावा. त्यांचे मंजूरीनंतर नमूद वेळेत सदरचे प्रमाणपत्र / दस्त दिला जातो.

3) रूग्ण / नागरिक यांना देण्यात येणारे ट्रेनिंग :-

रूग्ण आणि नागरिक यांना खालील शिक्षण हॉस्पिटलकडून दिले जाते.

प्रसूतीपूर्व काळजी जलसंजिवनी

फॅमिली प्लॉनिंग एच.आय.व्ही./एड्स बद्दलची माहिती व समुपदेश

लसीकरण करणे.

स्तनपान करणे,

शिक्षित आणि अनुभवी अधिका-यांकडून ट्रेंनिग बाह्यरूग्ण विभागातच दिले जाते. दृष्यश्राव आणि आ.ई.सी. उपकरणे प्रशिक्षणासाठी वापरली जातात. प्रशिक्षण विनाशुल्क असते. सदरहू ट्रेनिंग सत्रास हजर राहण्यासाठी हॉस्पिटलशी संलग्न असलेल्या आरोग्य विभागातील कर्मचा-याकडून आयोजन केले जाते.

4) हॉस्पिटलकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र :-

| अ.क्र. | प्रमाणपत्राचे नाव | रक्कम | अर्ज करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1) | वयाचा दाखला | रूपये 30/- | वैद्यकिय आलेख तंत्रज्ञ |
| 2) | अंडर ट्रिटमेंट दाखला | रूपये 30/- | वैद्यकिय आलेख तंत्रज्ञ |
| 3) | फिटनेस सर्टीफिकेट | रूपये 30/- | वैद्यकिय आलेख तंत्रज्ञ |

ज्यांना वरीलप्रमाणे कोणतेही प्रमाणपत्र हवे असेल त्यांनी वैद्यकिय अभिलेख तंत्रज्ञामार्फत यांना को-या कागदावर अर्ज करून आपले नाव, पत्ता, टेलिफोन नंबर, कोणता दाखला पाहिजे आणि सदर अर्जावर खाली आपली स्वाक्षरी करून, केस पेपरची झेरॉक्स प्रत बरोबर जोडावी, फी भरणा करावा. अर्ज संबंधित विभागाच्या डॉक्टरकडून मंजूर करून / प्रमुख वैद्यकिय अधिकारी यांचेकडून मंजूर करून घ्यावा. त्यानंतर त्याच दिवशी वैद्यकिय अभिलेख तंत्रज्ञाकडून दाखला देण्यात येईल.